# श्री राम चंद्र मिशन
# एकोज इंडिया

सप्टेंबर २००९ | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड २ अंक ५


प्रिय बंधू व भगिनींनो ,
प्रणाम.

तिरुप्पुर येथे साजऱ्या झालेल्या पूज्य गुरुदेवांच्या ८३व्या जन्मदिवसाच्या समारंभात एकोज इंडियाच्या स्टॉलवर अनेक अभ्यासींना भेटणे हा आमच्याकरिता एक आनंदाचा अनुभव होता.

३५० पेक्षाही अधिक अभ्यासींनी, निरनिराळ्या भाषांमध्ये असलेल्या या वार्तापत्रासाठी नोंदणी केली हे आम्ही अत्यंत समाधानाने नमूद करतो.

या वेळी झालेल्या स्वयंसेवकांच्या व समन्वयकांच्या बैठकीमुळे या वार्तापत्राचे समन्वय व वितरण या विषयांवर भर देण्यास मदत झाली.

या अंकामध्ये संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय युवक दिवस साजरा करण्याकरिता १२ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या अखिल भारतीय निबंध लेखन कार्यक्रमाच्या अहवाल आहे.

या अंकातील विभागीय बातम्यांमध्ये इंदोर, (म.प्र.) येथे झालेली प्रशिक्षकांची बैठक, चित्तनूर,(आं.प्र.) येथे मिशनच्या कार्यक्रमाची सुरुवात, रामगढ (झारखंड) येथील ध्यानकक्षाचे उद्घाटन तसेच अनेक विभागांमधील ओपन हाउस व अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम यांचा समावेश आहे.


आम्ही अशी आशा करतो की या वार्तापत्राचे वाचन आपल्याकरिता एक आनंददायी अनुभव ठरेल. गुरुदेवांच्याच शब्दात सांगायचे झाले, तर,' वाचा आणि आनंद घ्या' व 'करा आणि अनुभवा'!

सदिच्छांसह,
संपादकीय मंडळ

## चेन्नई



तिरुप्पूर येथे साजरा झालेल्या त्यांच्या जन्मदिवसाच्या उत्सवानंतर पूज्य गुरुदेव ३ ऑगस्ट रोजी चेन्नई येथे परतले. विमानतळावर जमलेल्या अभ्यासींनी त्यांचे भावनोत्कट स्वागत केले. काही कारणामुळे त्यांना बरेच अंतर चालावे लागले; परंतु गुरुदेवांना गाडी पर्यंत चालणे आवडत होते असे दिसले. आपल्या समोरील कुठल्याही, लहान व मोठ्या आव्हानाला ते किती सहजतेने सामोरे जातात हा धडा प्रत्येक अभ्यासीने शिकण्यासारखा आहे.



'डाउन मेमरी लेन' (Down Memory Lane) या आपल्या पुस्तकात पूज्य गुरुदेवांनी जबलपूर येथील त्यांचे बालपण व खाइस्ट चर्च शाळेत घेतलेल्या शिक्षणाबद्दल विस्तृतपणे लिहिले आहे. त्या दिवसांच्या आठवणी अनौपचारिक संभाषणात ते अनेकदा सांगतात. त्यामुळे, ४ ऑगस्ट रोजी या शाळेच्या मुख्याध्यापकांनी गुरुदेवांना दिलेली भेट हा एक विशेष प्रसंग होता.



खाइस्ट चर्च मूलांचे उच्च माध्यमिक विद्यालय, जबलपूर याचे विद्यमान मुख्याध्यापक श्री.एल. मॅथ्यू व त्यांच्यासहीत उत्तर भारत चर्चच्या जबलपूर केंद्राचे सन्माननीय सदस्य व सी. एन. आय. शाळेचे अध्यक्ष बिशप डॉ.पी.सी. सिंग यांनी गुरुदेवांची भेट घेतली. आपल्या शाळेच्या दिवसांच्या आठवणी जागवत गुरुदेवांनी काही काळ त्यांच्यासमवेत व्यतीत केला. पाहुण्यांनी आश्रमाचा फेरफटका मारून तेथील दिव्य वातावरणाबद्दल आनंद व्यक्त केला.



५ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या निमित्ताने अनेक बालकांनी व अभ्यासींनी गुरुदेवांना राख्या बांधल्या. कुणालाही नाराज न करता, खुशीने त्यांनी राख्यांचा स्वीकार केला. संध्याकाळी देखील गुरुदेव 'गोल्फ कार्ट' मधून फिरायला निघाले असताना अनेक अभ्यासी त्यांना राखी बांधण्याकरिता व मिठाई देण्याकरिता रांगेत उभे होते.

१३ ते १६ ऑगस्टच्या सुटटीमध्ये अनेक अभ्यासींनी चेन्नई येथे गर्दी केली होती. १३ तारखेला जन्माष्टमीच्या दिवशी गुरुदेवांनी ध्यान–कक्षामध्ये सत्संगाचे संचालन केल्याने उपस्थित अभ्यासी प्रफुल्लित झाले. १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनी सुद्धा ध्यान–कक्षात सत्संग झाला. निष्णात बासरी–वादक बंधु शशांक यांनी सत्संगानंतर गुरुदेवांच्या कॉटेजमध्ये बासरीवादनाचा उत्स्फूर्त कार्यक्रम करून सर्वांना सुखदाश्चर्याचा धक्का दिला. या उत्कृष्ट अशा कार्यक्रमाचा गुरुदेवांनीसुद्धा आस्वाद घेतला.

१६ ऑगस्टच्या सकाळी गुरुदेव ७ वाजून १० मिनिटांनी ध्यान–कक्षात पोहोचले व तेथे ते शांतपणे अभ्यासींची प्रतीक्षा करीत होते. सत्संग सुरु करण्यासाठी ७.२५ पर्यंत त्यांना वाट पाहावी लागली. 'आपण अभ्यासी असणे ही एक मोठी देणगी आहे. सत्संगासाठी जाता येणे ही त्याहूनही मोठी देणगी आहे. प्रत्यक्ष गुरुदेवांनी संचालित केलेल्या सत्संगात हजर असणे ही देणगी तर अतुलनीय आहे. त्यामुळे गुरुदेवांच्या (व प्रशिक्षकाच्या) आगमनापूर्वी कमीत–कमी अर्धा तास ध्यान–कक्षात उपस्थित राहणे हे प्रत्येक अभ्यासीचे कर्तव्य आहे. गुरुदेव व प्रशिक्षकांना आपली प्रतीक्षा करण्यास लावणे हा चांगला शिष्टाचार नाही. सत्संगात





मिळणाऱ्या दैवी देणगीचा स्वीकार करण्याकरिता आपण वेळेवर येऊन स्वत:ला सज्ज ठेवले पहिजे.' असे निवेदन या वेळी करण्यात आले. या निवेदनाचा चांगला परिणाम दुसऱ्याच आठवड्यात दिसून आला. गुरुदेवांच्या आगमनापूर्वी ध्यान–कक्ष जवळ–जवळ संपूर्ण भरला होता.

स्वाइन फ़्लू तापाच्या संभाव्य धोक्यामुळे गुरुदेवांनी त्यांचे दौरे स्थगित केले आहेत. पूर्ण भारतभरातून त्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या अभ्यासींनी त्यांना व्यग्र ठेवले आहे. गुरुदेवांची प्रशासकीय कामे, प्रशिक्षकांना तयार करणे, त्यांच्या कॉटेजजवळ गर्दी करणाऱ्या अभ्यासींना भेटणे ........ही यादी न संपणारी आहे. त्यांचे अथक चालणारे काम, आणि त्यांनी स्वत:साठी (आणि इतरांसाठीही) निश्चित केलेले आदर्श अनुकरणीय आहेत. त्यांच्या कामातील नीतितत्वे आणि प्रत्येक लहान गोष्टीतही तपशीलाकडे असणारे बारीक लक्ष यातून आपल्यालाही खूप काही शिकण्यासारखे आहे.

अभ्यासींबरोबरच्या अनौपचारिक वार्तालापातील काही महत्वाचे मुद्दे :

१. चेन्नई मुख्य न्यायालयाने, वाहनचालक मोबाईल फोन वापरताना आढळल्यास वाहन व फोन जप्त करण्याची अनुमती दिली आहे. (टाईम्स ऑफ इंडिया, रविवार दि. २३ ऑगस्ट २००९)

ही बातमी वाचून गुरुदेवांनी नि:संग्दिधपणे अभ्यासींना सांगितले, 'मी तुम्हा सर्वांना वाहन चालवताना मोबाईल वापरण्याची मनाई करत आहे. जर आलेला फोन घ्यायचाच असेल तर वाहन रस्त्याच्या कडेला उभे करावे आणि मगच तो घ्यावा'.

२. क्षमा करणे आणि विसरून जाणे : एका अभ्यासीने गुरुदेवांना विचारले, 'जर एखाद्याला आपल्या चुकीचा पश्चाताप झाला, तर आपण त्याला क्षमा करुन विसरून जाल का?' गुरुदेवांनी उत्तर दिले,  क्षमा तर मी ताबडतोब करतो, पण विसरणे त्या माणसाच्या हातात आहे. त्या माणसाच्या मनात जोपर्यंत ती आठवण आहे तोपर्यंत विसरणे माझ्यासाठी शक्य नाही.

३. शिस्तीबद्दल गुरुदेव म्हणाले,  आत्महितातून शिस्त निर्माण होते आणि उपभोग घेण्याच्या वृत्तीतून बेशिस्तपणा

## घोषणा



### भोजनापूर्वीच्या प्रार्थनेबद्दल गुरुदेवांची विनंती

मोलेना आश्रम, ऑगस्ट २००३

'अन्न व त्याच्या पवित्रतेबद्दल आम्हाला अजूनही चिंता आहे. आपण जे खातो त्याच्या जीवशास्त्रीय शुद्धतेबद्दल मी सांगत नसून आध्यात्मिक शुद्धतेबद्दल सांगत आहे.

पूज्य बाबूजींनी कोणताही पदार्थ खाण्यायोग्य व आध्यात्मिक दृष्ट्या उपयुक्त बनवण्याचा एक मार्ग दाखवला आहे. ते म्हणाले होते,  जेवण्याआधी एक क्षण ध्यान करा, आणि जेवण गुरुदेवांना अर्पण करा.  मी हे कधीही कोणालाही करताना पाहिलेले नाही. तर प्रयत्न करा. जरी ते एखादे सॅंडविच वा बिस्किट असेल तरीही क्षणभरासाठी डोळे मिटा व गुरुदेव स्वत: त्या अन्नाचा आस्वाद घेत आहेत असे समजा आणि आपल्या लक्षात येईल की ते अमृतमय झाले आहे. ते ना भारतीय जेवण असेल ना अमेरिकन. ते अन्न नसून अमृत असेल. अमृत सर्वांसाठी असते. ख्रिश्चन अमृत वा हिंदू अमृत वा मुस्लीम अमृत वा बौद्ध अमृत असे कधीही नसते. अमृत केवळ दिव्य असते.

### शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रम  भारत

भारतातील अभ्यासींकरिता दिनांक २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २००९ या दरम्यान कलकत्ता आश्रम येथे पहिल्या निवासी शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.  प्रशिक्षणाचे माध्यम इंग्रजी असेल. नवीन व उदयोन्मुख केंद्रांच्या अभ्यासींना प्रशिक्षित करणे, मिशनच्या कार्यात क्रियाशीलपणे सहभागी होणे, तसेच स्वत:च्या नियमित साधनेबरोबर आपापल्या कुवतीप्रमाणे मिशनची सर्वतोपरी सेवा करण्यास प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी उ.प्र. (पूर्व), पश्चिम बंगाल ,ओरिसा, ईशान्येकडील राज्ये,आसाम, बिहार व झारखंड तसेच उत्तराखंड व छत्तीसगढ येथील विभाग–प्रमुख आपापल्या विभागातील उमेदवारांचे अर्ज पाठवतील. निवडप्रक्रियेतून सुमारे ३०–३५ अभ्यासींची तुकडी पहिल्या अभ्यासवर्गासाठी निवडली जाईल.

### रिट्रीट सेंटरची वेळापत्रके

१ ऑक्टोबर २००९ पासून एस. एम. एस. एफ. रिट्रीट सेंटरच्या वेळापत्रकांमध्ये बदल करण्यात आले आहेत.

भगिनी व बंधुंकरिता एका आड एक महिन्यांमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. ऑक्टोबर २००९, डिसेंबर २००९ तसेच फेब्रुवारी, एप्रिल, जून, ऑगस्ट, ऑक्टोबर व डिसेंबर २०१० हे महिने केवळ भगिनींकरीता राखीव आहेत.

नोव्हेंबर २००९ तसेच जानेवारी, मार्च, मे, जुलै, सप्टेंबर व नोव्हेंबर २०१० हे महिने बंधू अभ्यासींकरिता राखीव ठेवण्यात आले आहेत.

ज्यांना रिट्रीट सेंटरला येण्यासाठी याआधीच परवानगी मिळालेली आहे, त्यांनी नवीन व्यवस्थेप्रमाणे आपल्या तारखा बदलून घ्याव्यात. अशा सर्व व्यक्तींना स्वतंत्र इ–मेल पाठविण्यात येईल. या बाबत काही शंका असल्यास retreat@sahajmarg.org  येथे संपर्क साधावा. रिट्रीटमध्ये लहान मुलांना आणण्याची परवानगी नाही याची नोंद घ्यावी.

## क्रेस्ट बेंगलूरु – तिसरे वर्धापनदिन



दिनांक 9 ऑगस्ट रोजी बेंगलूरु येथील क्रेस्टच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने स्वयंसेवक, शिक्षक व समन्वयकांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. 9 ऑगस्ट 2006 रोजी प्रथम पाक्षिक अभ्यासवर्गाची सुरुवात करुन गुरुदेवांनी क्रेस्टचे उद्घाटन केले होते.

या बैठकीची सुरुवात सकाळच्या सत्संगाने झाली व तिची समाप्ती दुपारच्या भोजनाने झाली. सुमारे 110 अभ्यासी या प्रसंगी उपस्थित होते. क्रेस्टचे संचालक बंधू आर.जगन्नाथन यांनी क्रेस्टमध्ये केल्या जाणाऱ्या अनेकविध प्रकल्पांबद्दल एक अहवाल सादर केला.

'मिशनमध्ये सेवा व सेवेचे विविध पैलू' या विषयावर एका पॅनेल चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. बंधू भास्कर राव, बंधू के. टी. मंजुनाथ व बंधू बी. जी. सुब्रमण्या या प्रशिक्षकांनी यात भाग घेतला. सर–परीक्षक म्हणून बंधू श्री. बी. श्रीवास्तव यांनी कामपाहिले.या विषयावरील अनेक मुद्दे या चर्चेत मांडले गेले व प्रशिक्षकांनी त्यावर आपले अभिप्राय नोंदवले. जमलेल्या प्रेक्षकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले व आपल्या शंकांचे निरसन करुन घेतले. साधनेचा नियमितपणा व गुरुदेवांच्या प्रति संपूर्ण समर्पण यांचे महत्त्व या चर्चासत्रात प्रकर्षाने मांडले गेले.

भक्तीसंगीत, बासरी–वादन व 'खरी किंमत' नावाची एक नाटिका यांचा समावेश असणारा सांस्कृतिक कार्यक्रम यानंतर सादर करण्यात आला.

उप संचालक बंधू प्रमोद जोहरी यांनी आभार–प्रदर्शन केले. गुरुदेवांसाठी अभिमानाने व प्रेमाने काम करण्याचा नवा उत्साह सर्वांनाच प्राप्त झाला.

## ध्यान–कक्षाचे उद्घाटन, रामगढ, झारखंड

रामगढ केंद्राच्या अभ्यासींकरिता ८ ऑगस्टचा दिवस विशेष आनंदाचा होता. १९७० पासून नियमित साधना करणाऱ्या श्री. राजनाथ तिवारी यांच्या हस्ते, गुरुदेवांच्या कृपाप्रसादाने ध्यान–कक्षाचे उद्घाटन झाले. विभाग–प्रमुख श्री. जी. एम. भटनागर व अनेक केंद्रांचे अभ्यासी या प्रसंगी उपस्थित होते. यानंतर सत्संगाचे आयोजन केले होते.

नाश्त्यानंतर 'मूलभूत अभ्यासी प्रशिक्षण' या कार्यक्रमाची सुरुवात झाली. ध्यान, शुद्धीकरण, प्रार्थना व सतत स्मरण या चार प्रमुख मुद्द्यांबाबत चर्चा झाली.बंधू परमानंद पांडे व भगिनी अल्पना तिवारी हे या कार्यक्रमाचे प्रशिक्षक होते. रांची केंद्राच्या भगिनी अनिता तिवारी यांनी अभ्यासींकरिता एक चाचणी घेतली व त्यानंतर 'गुरुदेव म्हणजे काय?' ही सी.डी. दाखवण्यात आली.

विभाग क्रमांक १७ च्या प्रशिक्षकांची बैठक त्याच सुमारास दुसऱ्या कक्षात सुरु होती. तिरुप्पुर येथे झालेली प्रशिक्षक बैठक, प्रशिक्षक नियमावली, मासिक व प्रादेशिक कार्यक्रमांची दिन–दर्शिका, मिशनच्या केंद्रांची वाढ होण्यासाठी प्रयत्न, शिक्षकांमध्ये सुधारणा, एस. एम.आर.टी. आय. चे कार्यक्रम, व्ही.बी. एस. ई. व एकोज इंडिया वार्तापत्र हे या बैठकीतील प्रमुख मुद्दे होते. संध्याकाळच्या सत्संगानंतर लहान मुलांनी भजने सादर केली.

दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या सत्संगाने झाली. त्यानंतरच्या ओपन हाउस करिता सुमारे ३० व्यक्ती उपस्थित होत्या. १५ व्यक्तिंनी साधनेची सुरुवात केली व ५ जण लवकरच साधना सुरु करणार आहेत. दोन दिवसांच्या या कार्यक्रमाला दोनशे अभ्यासी हजर होते.

## गोदावरीखाणी, आंध्रप्रदेश – भंडाऱ्यातून आपण काय शिकलो?

सुमारे १२५ अभ्यासींचा सहभाग असणारा पूर्ण दिवसीय कार्यक्रम गोदावरीखाणी केंद्राने ९ ऑगस्ट रोजी आयोजित केला होता. तिरुप्पुर येथील गुरुदेवांच्या जन्म–दिवसाच्या उत्सवाच्या अनुभवांची देवाण–घेवाण करणे व त्यातून शिकणे यावर या कार्यक्रमात भर देण्यात आला.

अभ्यासींनी तिरुप्पुर येथे घेतलेले अनुभव व त्यातून ते काय शिकले हे थोडक्यात असे:

- भंडाऱ्यात गुरुदेवांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली असो व नसो, सर्वांना त्यांच्याबरोबर आंतरिक जवळिकताची जाणीव झाली.
- भंडाऱ्याहून परतल्यावर हृदयामध्ये तीव्र अशी आध्यात्मिक इच्छा जाणवली व भौतिक गोष्टींबद्दल अलिप्तपणा जाणवला..
- व्यक्तिगत तसेच सामुहिक ध्यानामध्ये शांततेची जाणीव झाली.
- भंडाऱ्याच्या ठिकाणी संख्येने कमी असणाऱ्या स्वयंसेवकांनी केलेले प्रचंड काम त्यांच्या उत्कृष्ट सामुहिक प्रयत्नांची साक्ष देते. या गोष्टीला अभ्यासींनी दाद दिली व अशी सामुहिक प्रयत्नांची भावना स्थानिक पातळीवरही असावी असे मत व्यक्त केले.
- तिरुप्पुरमध्ये ज्याप्रमाणे स्थानिक व इतर अभ्यासी यामध्ये कसलाही भेद–भाव नव्हता, त्याच प्रकारे बन्धुत्वाची खरी भावना वाढीस लागण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले गेले.

# श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया


विभागीय कार्यक्रम

सप्टेंबर २००९ | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड २ अंक ५


## अखिल भारतीय निबंध लेखन स्पर्धा

गुरुदेव मुलांना आणि तरुणवर्गाला खूप महत्व देतात कारण ते भविष्य घडविणारे आधारस्तंभ आहेत. यु.एन. आंतराष्ट्रीय युवक दिवसाचे औचित्य साधून १२ ऑगस्ट २००९ रोजी शैक्षणिक संस्था तसेच एस. आर. सी. एम.च्या विविध केंद्रावर एक निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा श्री राम चंद्र मिशन आणि युनायटेड नेशन इन्फर्मेशन सेंटर (भारत आणि भुतान ) यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. बालक आणि युवक यांच्या अंगी प्रेम आणि सहनशीलता या मुल्यगुणांचा विकास व्हावा यासाठी त्यांना उद्युक्त करणे हे ह्या स्पर्धेचे उद्दिष्ट होते. मानवी एकात्मता आणि विविध भाषेंचा अडथळा दूर करून निबंध लेखन स्पर्धा १३ प्रादेशिक भाषांमध्ये घेण्यात आली. देशातल्या अनेक शाळा, महाविद्यालयांमध्ये अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात ही स्पर्धा झाली.

**केरळ** राज्यात अलुवा येथे असलेल्या केरळ विभाग आश्रमामध्ये विविध केंद्रातून आलेल्या १४० स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले गेले. राज्यातील निरनिराळ्या भागांमध्ये असलेली अंदाजे १००० शाळा आणि महाविद्यालये सहभागी झाली होती. येथे लावलेले माहिती फलक अतिशय मोक्याच्या ठिकाणी आणि ठळकपणे लावले होते तसेच त्यावर लिहिलेल्या लक्षवेधी विचारांमुळे पालक, मुले आणि शिक्षक यांच्यामध्ये उत्साह आणि उत्सुकता निर्माण झाली ज्यायोगे अनेकांनी मिशन बद्दल जाणून घेण्याची इच्छा दर्शविली. काही शाळांनी मुलांमध्ये या मूल्यगुणांची वाढ व्हावी या दृष्टीने असे कार्यक्रम पुन्हापुन्हा घेण्याची विनंती केली. सध्या स्वयंसेवक लेखन गोळा करण्याच्या कामामध्ये आहेत आणि विभागवार तपासणी सप्टेंबर महिन्यात अलुवा येथील विभागीय आश्रमात होईल. निवडक निबंध राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या मूल्याकंनासाठी पाठविले जातील.





**अहमदाबादमधून** २०३ विद्यापीठे सहभागी झाली. साधारणत: ९७०० निबंध गुजराथी, हिंदी आणि इंग्लिश भाषांमध्ये येणे अपेक्षित आहे. केंद्र ६ भौगोलिक प्रांतांमध्ये विभागलेले आहे आणि स्वयंसेवकांचा संघ त्यांना वाटून दिलेली कामे पूर्ण करीत आहेत. अशा प्रकारचा उपक्रम अहमदाबाद केंद्रामध्ये प्रथमच करण्यात आला आणि महत्वाच्या शिक्षण मंडळांकडून मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता.

**बडोदा** केंद्रात सुमारे ५६ शैक्षणिक संस्थांमधील अंदाजे ५७०० उत्सुक विद्यार्थ्यांनी पूर्णपणे उत्साहाने आणि हिरिरिने भाग घेतला. एकनिष्ठ स्वयंसेवकांच्या २० जणांच्या संघाने या महाकाय स्पर्धेची आखणी आधीपासूनच केली होती. निबंध इंग्लिश, हिंदी आणि गुजराथी भाषांमध्ये लिहिले गेले. यांची तपासणी सध्या जोरात चालू आहे.

दक्षिण **कर्नाटक**मधील अंदाजे ५०-६० स्वयंसेवकांनी राज्यातील विविध शाळा महाविद्यालयात मुलांमध्ये जागृती निर्माण करणे तसेच विविध संस्थांना कार्यक्रम घेण्याबद्दल उद्युक्त करणे यासाठी संपर्क साधला. संस्थांमधून चांगला प्रतिसाद मिळाला (विशेषत: शाळांमधून कारण त्यातील बरेच जण मुलांमध्ये मुल्यगुण जपले जावेत या दृष्टीने योग्य मार्गाच्या शोधात होते आणि तो मिळाल्याने ते आनंदित झाले.सध्या दक्षिण कर्नाटकातील सुमारे ६०० शाळा आणि महाविद्यालये या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. सर्वोत्कृष्ट निबंधांची निवड करण्याची प्रक्रिया राज्यस्तरावर तसेच राष्ट्रीयस्तरावर थोड्याच अवधीत चालू होईल.



## चित्तनूर (आंध्र प्रदेश) केंद्राचा विकास

चित्तनूर हे आंध्रप्रदेशातील मेहबूबनगर जिल्ह्यातील एक खेडे आहे. १९९१ मध्ये जेव्हा हे केंद्र चालू झाले तेव्हा तेथे केवळ दोन अभ्यासी होते आणि आता ३५ पेक्षा जास्त अभ्यासी असलेल्या या केंद्रात बहुतांशी रोजगार मिळणारे शेतकरी आहेत. अभ्यासींच्या या वाढत्या उपस्थितीमुळे सध्याची एका अभ्यासीच्या घरी एकत्र येण्याची जागा अपुरी पडू लागली. ही गरज ओळखून दोन अभ्यासींनी मिळून सरकारकडून एक जमिनीचा छोटासा तुकडा विकत घेतला आणि गुरुदेवांकडून त्यावर ( १८ फूट * ३० फूट) ध्यानगृह बांधण्याची परवानगी मिळवली. एका वर्षानंतर हे बांधून पूर्ण झाले आणि गुरुदेवांनी १६ ऑगस्ट २००९, रविवार रोजी पहिला सत्संग घेण्यास परवानगी दिली. हा दिवस मेहबूबनगर जिल्ह्यामधील अभ्यासींसाठी खरोखरच विशेष होता कारण या संपूर्ण जिल्ह्यातील ही पहिली इमारत पूर्णपणे मिशनच्या कार्यासाठी वापरण्यात आली. जिल्ह्यातील ७५ पेक्षा जास्त अभ्यासी या कार्यक्रमात सहभागी झाले होते आणि सहजमार्गाची खोलवर ओळख होण्याच्या दृष्टीने संपूर्ण दिवस त्यांनी तेथे व्यतीत केला. एक वक्त्याने सहज त्याच्या भाषणामध्ये उल्लेख केला की 'चित्तनूरचे सभागृह हे प्रेम, श्रद्धा आणि अभ्यासींच्या अथक प्रयत्नांमुळे कमी पैशात कसे बांधता येते' याचे महत्वाचे उदाहरण आहे.

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया

विभागीय कार्यक्रम

सप्टेंबर २००९ | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड २ अंक ५


## प्रशिक्षण कार्यक्रम आणि शिबीरे – मंगलोर



अभ्यासींना सहजमार्गाची संपूर्णपणे ओळख व्हावी या उद्देशाने अनेक केंद्रांनी गेल्या दोन महिन्यात शिबीरे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले. ह्या उपक्रमांमुळे अभ्यासींना एकत्रित येण्याची संधी मिळाली तसेच साधनेमध्ये नियमित होवून मिशनच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली.

अंदाजे ३५ अभ्यासींच्या उपस्थितीत रविवार ९ ऑगस्ट २००९ रोजी मंगलोर केंद्रात बंधू मोहनदास यांनी एक कार्यशिक्षण शिबीर घेतले.

सत्संगानंतर 'कर्तव्य आणि जबाबदारी' या विषयावरील गुरुदेवांची ध्वनीचित्रफीत दाखविण्यात आली. त्यानंतर भंडारयात सहभागी होण्याचे महत्व आणि तेथे मिळालेली अध्यात्मिक स्थिती तशीच ठेवणे यावर भर देण्यात आला.

स्वच्छ चारित्र्याची घडवणूक या विषयावरील महत्व विषद करून सांगताना ते म्हणाले आपले राहणीमान असे बनविले पाहिजे की दुसऱ्यात आपल्याला प्रेम आणि ईश्वरनिष्ठा जागृत करता आली पाहिजे. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लागणारे स्वच्छ चारित्र्य घडविण्यासाठी आपल्या इच्छा शक्तीचा वापर आपण केला पाहिजे.

गुरुदेवांची मानवविकासातील भूमिका आणि साधनेतील नियमितपणा अशा इतर विषयांवरही चर्चा झाली. रात्री झोपण्याआधीची प्रार्थना योग्य पद्धतीने कशी करावी याचे स्पष्टीकरण दिले गेले. केंद्रात मिशनची वाढ कशी होईल या विषयी वेगवेगळे विचार पुढे यावेत यासाठी एक गटचर्चा घेण्यात आली.

## भोपाळ – मध्यप्रदेशातील प्रशिक्षकांची सभा

तब्बल नऊ वर्षांनंतर भोपाळमध्ये १५ ऑगस्ट २००९ रोजी एक सभा घेण्यात आली. प्रशिक्षकांच्या कामासंबंधीत अनेक महत्वाच्या विषयांवर पुन:चर्चा झाली आणि पुढील महिन्यांसाठीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला.

❖ प्रशिक्षकांची स्वत:ची साधना आणि त्यांचे अनुभव यावर भर देण्यात आला.

❖ मिशनमध्ये आपापसात सोप्या रीतीने संपर्क ठेवता यावे यासाठी ईमेल चा वापर करण्याचे महत्व सांगितले.

❖ विभागातील एस.एम.आर.टी.आय च्या कार्यासंबंधीच्या योजना आणि विभागीय कार्याविषयीच्या दिनदर्शिका वर पुन:चर्चा झाली.

❖ मुख्य कार्यालयाकडून आलेल्या २००८ चे सुरक्षाविषयक नियम कसे राबविता येतील याविषयी उपस्थितांसाठी सादरीकरण झाले.

❖ विभाग प्रमुख बंधू विकल्प यांनी बरेच विषय हाताळले जसे की – केंद्रप्रमुखांची निरनिराळ्या कार्यांचे व्यवस्थापन करण्याविषयीची जबाबदारी, विविध आश्रमांची बांधकामे पूर्णत्वास नेणे, सभासद वर्गणी, ओपन हाऊस, प्रशिक्षण कार्यक्रम, प्रशिक्षकांच्या दूरच्या केंद्रांना भेटी, प्रशिक्षकांच्या मासिक सभा आणि इत्यादी.

❖ 'विभागाचे भविष्य' यावर बंधू सचिन सिन्हा यांचे जे सादरीकरण झाले ते मिशनच्या भवितव्यावर एक दृष्टीक्षेप टाकण्याच्या दृष्टीने सहायक ठरले.

## इंदोर



रविवार 5 जुलै रोजी इंदोर केंद्राने 'मनुष्यजातीमध्ये आमूलाग्र बदल' या विषयावर एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अनेक वक्त्यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले. बंधू सिन्हा यांनी 'आतला प्रवास' या विषयावर बोलताना साधनेमुळे आपले 'खालच्या दर्जाच्या स्व'चे 'श्रेष्ठ दर्जाच्या स्व'मध्ये कसे परिवर्तन होते हे सांगितले. 'जगाचे परिवर्तन' – हे गुरुदेवांचे स्वप्न साकार करण्या साठी प्रेम व बंधुत्वेची भावना वृद्धिंगत करण्याचे महत्त्व बंधू श्रीवास्तव यांनी विशद केले. 'गुरुदेवांप्रती प्रेम हा आध्यात्मिक उन्नतीचा सर्वात जलद मार्ग आहे' असे प्रतिपादन बंधू अविनाश व बंधू राजेश यांनी केले. ते पुढे म्हणाले की प्रेम हे त्याच्या योग्य व नैसर्गिक लक्ष्याकडे – 'देवाकडे' वळवले पाहिजे. प्रेरणादायी पॉवर–पॉइंट प्रेझेंटेशन, छोटे चित्रपट व नाविन्यपूर्ण चाचणी यांनी विभागप्रमुख बंधू विकल्प यांनी या कार्यक्रमाचा समारोप केला. आध्यात्मिक उन्नती विषयी परस्परांच्या विचारांची देवाण–घेवाण करण्याच्या सत्राचाही अभ्यासींना फायदा झाला. सर्वसाधारणपणे अशा कार्यक्रमांना असणाऱ्या उपस्थितीपेक्षा कितीतरी जास्त अभ्यासी (सुमारे 400) या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## नागपूर (महाराष्ट्र) येथील अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

विदर्भातील अभ्यासींसाठी २८ जून २००९ रोजी नागपूर केंद्राने 'स्मृति'चा एकदिवसीय ओळख प्रशिक्षण कार्यक्रम' आयोजित केला. नासिक केंद्रातील भगिनी अनुसुया रामचंद्रन यांना हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी आमंत्रित केले होते.

नागपूर आणि जवळपासच्या सात केंद्रांमधून सुमारे ३० अभ्यासींनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. ह्याचे आयोजन कुशलतेने केल्याने हा कार्यक्रम वैचारिक देवाणघेवाण यांनी परीपूर्ण झाला ज्यायोगे अभ्यासी संपूर्ण दिवस या कार्यक्रमात गर्क होते.

प्रश्नोत्तरे असलेल्या भागात भगिनी अनुसुया यांनी नवीन अभ्यासींच्या शंकांचे निरसन केले. श्रोत्यांकडून प्रतिसाद उत्तम मिळाला आणि त्यांनी त्यांचे अनुभव आणि विचार फ़ीडबॅक फ़ॉर्म द्वारे व्यक्त केले. सर्व अभ्यासींनी ह्या कार्यक्रमामधील समाविष्ट असलेल्या गोष्टी वाखाणल्या आणि असे कार्यक्रम नियमितपणे होणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. एक वर्षापेक्षा जास्त काळ मिशनमध्ये असलेल्या अभ्यासींसाठीसुद्धा हा कार्यक्रम असावा अशी काहींची इच्छा होती.



श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
विभागीय कार्यक्रम
सप्टेंबर २००९ केवळ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ५

# उत्तर कर्नाटकामधील खुल्या मंचाचे आयोजन

गेल्या दोन महिन्यामध्ये उत्तर कर्नाटकाने बऱ्याच खुल्या मंचांचे आयोजन केले होते. ब्याडगी, हवेरी, राणीबेन्नूर, गदग आणि गुलबर्गा येथे या मंचांचे आयोजन केले होते. बंधू काशांपुरकर, बंधू गजेंद्र आणि भगिनी सुजाता यांनी सहज मार्गासंबंधित गुरुदेव, संस्था आणि पद्धती अशा अनेक विषयांवर वक्तव्य केले. या सत्रांना मिळालेला प्रतिसादही चांगला होता आणि बऱ्याच जणांनी पद्धती स्वीकारण्यामध्ये रुची दर्शविली.



५ जुलै रोजी गुलबर्गा येथे मदर टेरेसा डी. एड. महविद्यालयामध्ये एक कार्यक्रम झाला. बंधू गौतम अलीपूर आणि बंधू महेश देशपांडे यांनी कार्य्रक्रमाचे संचालन केले. सुमारे १०० विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी काळजी पूर्वक ऐकून घेतले आणि त्यानंतर त्यांच्या बऱ्याच प्रश्नांना वक्त्यांनी उत्तरे दिली.



राणीबेन्नूर पासून २० किमीवर स्थित हावेरी जिल्ह्याच्या **ब्याडगी** येथे एम. डी. एच. शाळेच्या आवारामध्ये अधिकतर शिक्षक व इतर अशा २५–३० इच्छुकांसाठी एका खुल्या मंचाचे आयोजन करण्यात आले. समाजामध्ये मूल्यांचा पुन्हा सामावेश होण्यासाठी सहज मार्गासारख्या मार्गांचा अवलंब करणे गरजेचे आहे या विचारावर मुख्याध्यापिका बोलल्या. ज्यांनी या सत्रामध्ये भाग घेतला त्यानां अशा तात्विक परिचयानंतर साधना सुरु करण्यास त्यांनी आवर्जून सांगितले.



हुबळीपासून सुमारे ७५ किमी अंतरावरील **हावेरी** येथे भगिनी सुजाता केशव यांनी एका खुल्या मंचाचे आयोजन केले. सुमारे २५–३० जण या सभेस उपस्थित होते. अधिकतर महिला व काहीच पुरुष अशा समुदायाचे हे सत्र अतिशय साधे असे होते. दावणगेरे केंद्राच्या विनायक नामक युवकाने येथील स्थानिक माहिती असल्याने या कार्यक्रमामध्ये बरीच मदत केली तसेच सहजमार्गामधील आपले अनुभव सांगून 'बदल' याविषयी गुरुदेवांचे विचार अस्खलितपणे मांडले. हवेरी येथे माहिती अधिकारी असलेल्या बंधु मायाचार यांनी कार्यक्रमाचे प्रभावी संचालन केले.





**राणीबेन्नूर** हे हावेरी जिल्ह्यातील एक महत्वाचे ठिकाण आहे आणि ते हावेरीपासून सुमारे ४० किमी अंतरावर आहे. जे.सी.आय. (Junior Chamber International) या युवक आणि युवा उद्योजकांच्या संघटनेच्या स्थानिक विभागाच्या समायोजनेने एका खुल्या मंचाचे आयोजन केले ज्यामध्ये मुख्यत्वे संघटनेच्या सदस्यांसमवेत सुमारे ३५ जण उपस्थित होते. विषय होता: सहजमार्ग पद्धतीमध्ये ध्यान. संघटनेच्या अध्यक्षांनी ज्या स्वत: एक डॉक्टर आहेत, समारोपामध्ये ध्यानाच्या मर्माचा स्वीकार असल्याचे व मानवाचे परिवर्तन ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

**गुलबर्गा** येथे ६ जुलै रोजी भगिनी हरीकुमारी यांच्या घरी एका संम्मेलनाचे आयोजन केले होते. १९ इच्छुकांनी यामध्ये भाग घेतला. त्यामध्ये गुजराती घरातील महिलांचा समावेष अधिक होता. भगिनी हरीकुमारी यांनी सहजमार्गाची ओळख करून दिली आणि भगिनी लक्ष्मी चौहान यांनी अध्यात्मिकता कशासाठी, सहजमार्ग कशासाठी, सदगुरूंची गरज अशा विषयांवर वक्तव्य केले. भगिनी रमोला चौडा शुद्धिकरणावर बोलल्या. अगदी घरगुती वतावरणामध्ये हे सत्र पार पडले. उपस्थितांमध्ये जास्तीत जास्त जणांना गुजराती समजत असल्याने, हे सत्र गुजराती भाषेमध्ये घेतले गेले.

जर तुम्हाला काही अडथळा किंवा गुंतागुंत जाणवली किंवा भावनांची असह्य अशी खळबळ होत आहे असे वाटले, तर कुठल्याही वेळी, कुठल्याही ठिकाणाहून ती प्रार्थनेमार्फत गुरुदेवांकडे पाठवा, आणि ती ताबडतोब निघून जाईल.

Thus Speaks Babuji, पान ३२



## मूल्याधारित आध्यात्मिक शिक्षणाची सुरुवात – सोलापूर, महाराष्ट्र



SMRTI ने दिलेल्या पाठ्यक्रमानुसार पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी सोलापूर केंद्राने मूल्याधारित आध्यात्मिक शिक्षणाची नवीन सुरुवात केली. दर महिन्याच्या एका रविवारी वर्ग घेतला जाईल – अशा प्रकारे हा पाठ्यक्रम एक वर्षभर राबविला जाईल.

दि. १२ जुलै २००९ रोजी सिंधु विहार परिसरातील मुलांना ध्यानमंदिरात घेऊन जाण्यात आले. मुळातच शिक्षिका असलेल्या भगिनी शुभदा व भगिनी छाया यांनी ५९ मुलांना कष्ट, एकजूट, बंधुभाव, मैत्री व वाटून घेण्याची सवय या गोष्टी कथा स्वरुपात ध्वनीचित्रफितीच्या सहाय्याने शिकविल्या. आश्चर्याची गोष्ट अशी की मुलांना त्यांना सांगितलेल्या गोष्टींचा अर्थ विचारला असता त्यांनी दाखवून दिले की, जर संधी मिळाली तर लहान मुले त्या गोष्टींचा मोठ्यांपेक्षाही चांगल्या प्रकारे गर्भितार्थ काढू शकतात.

दैनंदीन जीवनात व्यायामाचे महत्व व गरज यावर ही भर देण्यात आला ज्याला मुलांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. युवा मंचाच्या स्वयंसेवकांकडून पुढील महिन्यात चालविल्या जाणाऱ्या व्यायाम प्रशिक्षण शिबीरामध्ये त्यांनी नोंदणी केली.

या सत्रामध्ये मुलांनी दाखविलेल्या उत्साहाने स्वयंसेवकांना, भावी पिढीच्या विकासासाठी अशा प्रकारच्या सत्रांचे वरचेवर आयोजन करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. त्यातील सर्वच मुले अभ्यासी कुटुंबातील नसून देखील त्यांनी आपल्या संस्थेची प्रार्थना इंग्रजीमध्ये पाठ केली होती हे पाहून गहिवरून आले.

## रहिवाशी छावणी: क्षेत्रीय आश्रम, तुमकुंठा, हैद्राबाद.

ज्या अभ्यासींनी साधेनेची ५ वर्षे पूर्ण केली आहेत अशांसाठी शुक्रवार ७ ऑगस्ट ते रविवार ९ ऑगस्टै २००९ पर्यंत एका रहिवाशी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आजच्या अतिशय चढाओढीच्या आधुनिक जीवनामध्ये सहज मार्गाचा अवलंब आपण कसा केला आहे याचे अंतर्मुख होऊन पुनरावलोकन करणे सुलभ करुन देणे, साधना नियमितपणे आणि पद्धतीनुरुप व आवडीने, संपर्कतेने व जबाबदारीने करण्यासाठी आपण काय करावे याची खुलेपणाने चर्चा करणे ही या छावणीची उद्दिष्ये होती.

अतिशय तणावपूर्ण दैनंदिनी, रात्रपाळी, अनुचित प्रवृत्ती, दुर्बळ इच्छाशक्ती व आळस अशा विविध कारणांमुळे ज्यांना साधनेमध्ये नियमित होता येत नव्हते अशा १८ युवा अभ्यासिंनी यामध्ये भाग घेतला होता.

नैसर्गिक वतावरणात सर्व जण एकत्र राहिले व त्यांनी आपल्या भावना व अडचणी एकमेकांना सांगितल्या. त्यांच्या या खुलेपणामुळेच त्यांना आपापसातच उत्तरही मिळाले. शांत व प्रसन्न वातावरणामध्ये ध्यानाच्या बैठकाही घेण्यात आल्या. एकेका व्यक्तिबरोबर केलेल्या बैठकींमुळे ध्यानासंबंधीच्या प्रश्नांसाठी बराच वेळ मिळाला.

सर्वांनीच ध्यानाच्या वैयक्तिक बैठकी व चर्चेचा खूपच फायदा झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. प्रत्येकाने स्वत:च्या साधनेमध्ये सुधार करण्याचा प्रण घेतला. सहभागींनी साधनेमध्ये होणाऱ्या मानवी चुकांवर एक गमतीशीर परंतु अर्थपूर्ण नाटिका सादर केली ज्यामुळे तेथील वातावरण थोडे सौम्य झाले. सहभागी व आयोजक यांच्या टिप्पणीबरोबर ही छावणी रविवारी सायंकाळी ६ वाजता संपन्न झाली.

## ओस्मानिया वैद्यकीय महाविद्यालयामध्ये चर्चात्मक कार्याशाळा:

ओस्मानिया वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारात दि ४ ऑगस्ट २००९ रोजी वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी एका चर्चात्मक कार्याशाळेचे आयोजन करण्यात आले. सहभागींमध्ये महाविद्यालयाचे २०० नवीन विद्यार्थी होते. पहिल्या वक्त्याने दैनंदीन जीवनामधील साध्या उदाहरणांसमवेत "जीवनाचा योग्य दृष्टिप्रांत" यावर चर्चा केली. दुसऱ्या वक्त्याने जीवनामध्ये व्यक्तिगक्त लक्ष्याची गरज काय व ते आंमलात कसे आणावे ते सांगितले. त्यांनी प्रवृत्ती, धैर्य व मनावर नियंत्रण यावरही चर्चा केली. कार्यक्रमाची सांगता एका लहानशा ध्वनीचित्रफीताने झाली.

चर्चेची सुरुवात काहीशी उदासीनच झाली कारण तो या नवीन मुलांचा महाविद्यालयात केवळ दुसराच दिवस होता. परंतु नंतर हळुहळु चर्चेला उधाण आले. या कार्यक्रमामध्ये सहभागी होऊ शकल्यामुळे एका कृतज्ञतेच्या व आनंदाच्या भावनेबरोबरच इतर काही प्रतिक्रियाही होत्या:

"... या कार्यक्रमाने माझे जीवनच बदलून टाकले आहे..."

"... अतिशय निर्वाणीच्या वेळी हा कार्यक्रम आला आहे..."

"... मला समजले की मी काय आहे आणि माझी या समाजामध्ये काय भूमिका आहे..."

"... या कार्यक्रमाने माझ्या जीवनात शांतता आणली आहे..."

"... मला समजले की माझा आत्माच सर्वात महत्वाची गोष्ट आहे..."

नियमित कालांतराने असे कार्यक्रम झाले पाहिजेत अशा बऱ्याच विनंत्याही आल्या. प्रतिक्रियांमध्ये एक सर्वात जास्त मन हेलावणारी गोष्ट होती आणि ती म्हणजे – इतर शाळा व महाविद्यालयातही व विशेषत: लहान शहरांमध्ये व खेड्यांमध्ये असे कार्यक्रम झाले पहिजेत अशा अनेक विनंत्या व त्यांची इतरांविषयीची तळमळीची भावना.


# श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया

प्रकाशाची केंद्रे

सप्टेंबर २००९ | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड २ अंक ५











## आर के पुरम, दिल्ली येथील आश्रम

दिल्ली केंद्राची स्थापना १९५८ मध्ये झाली होती आणि या देशाच्या राजधानीमध्ये श्री राम चंद्र मिशनच्या कार्यकलापांसाठी कोणतेच ठराविक स्थान नव्हते. ६ नोव्हेंबर १९८६ रोजी दक्षिण दिल्लीमधील आर.के. पुरम च्या सेक्टर–४ मध्ये ९०० चौरस यार्ड एवढी जागा दिल्ली प्रशासनाकडून श्री राम चंद्र मिशनला मिळाली. श्री राम चंद्र मिशनला योगशिक्षण देणारी शिक्षण संस्था म्हणून जाणणाऱ्या भारत सरकारच्या 'शिक्षण व संस्कृती मंत्रालयाच्या' शिफारसीने हे झाले होते. १९ नोव्हेंबर १९८६ रोजी त्यांच्या पत्नी श्रीमती सुलोचना (मामी) समवेत गुरुदेवांनी या जागेची पाहणी केली व त्या परिसरामध्ये वृक्षारोपण केले.

१९८७ च्या वसंत पंचमीच्या दिवशी ३ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांच्या हस्ते शिलान्यास झाला. त्याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, "प्रेम बाह्य स्वरुपामध्ये नसते तर ते अंतर्भूत असते. जसे की जेव्हा तुम्ही एखाद्या दुकानातून काही वस्तु विकत घेता तेव्हा ती वस्तु कितीही चांगल्या कागदाच्या आवरणामध्ये दिली असो, ती वस्तु तीच असते. म्हणजे बाह्य आवरण नव्हे तर वस्तु महत्वाची असते. बाहेरचे कागदी आवरण, किमान आजच्या आधुनिक जगात, फाडून फेकून दिले जाते. जे काही आत आहे त्यालाच जपले जाते. एक गुरुलाही तेच हवे असते – आपल्या आतील गाभा."

जर्मनीचे एक वास्तुशास्त्र विशारद, बंधू ओटो स्टीड्ल यांनी आश्रमाची रचना केली. जरी आराखडा १९८७ मध्येच तयार झाला असला तरी परवाना मिळण्यासाठी बराच वेळ लागला आणि म्हणून ऑक्टोबर १९८९ मध्ये बांधकाम सुरु होईपर्यंत सत्संग त्या जागेमधील शामियान्यातच होत होता.



गुरुदेव सफदरजंग एन्क्लेव मधील एम एम कपूर यांच्या समवेत रहात असत व सहसा ते डीअर पार्क पार करून शामियान्यापर्यंत चालत जात असत. तिथे ते परदेशी अभ्यासींना स्वच्छंदपणे फिरणारे मोर दाखवित असत. अशाच एका वेळी एक सुंदर मोर आपला पूर्ण पिसारा फुलवून पाठमोरा उभा होता. गुरुदेवांनी अभ्यासींना त्याची सुंदर रंगीबेरंगी समोरची बाजु दाखवावी म्हणून त्याला "मागे फिर" म्हणता क्षणीच त्या मोराने ते ऐकले व तो मागे वळाला.

तशी पाहता जागा लहानच असल्याने बांधकाम ४ मजल्यांचे केले गेले ज्यामध्ये आश्रमाला भेट देण्यासाठी आलेल्या अभ्यासींच्या राहण्याची सोय बेसमेंट मध्ये केली जाते. १३ ऑक्टोबर १९९१ रोजी गुरुदेवांनी या बेसमेंट मध्ये पहिला सत्संग केला होता. सत्संग व इतर सम्मेलनासाठी बसण्यासाठी तळ मजला व गॅलरी वापरली गेली. दुसऱ्या मजल्यावर दोन खोल्यांचे एक अपार्टमेंट आहे ज्यामध्ये गुरुदेव २ डिसेंबर १९९२ रोजी प्रथमच राहिले होते.

एकदा जेव्हा पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी लोखंडी सळ्या घातल्या होत्या तेव्हा गुरुदेव त्याची पाहणी करण्यासाठी तेथे गेले असता एकावाकलेल्या सळीचे एक टोक त्यांच्या बोटाला लागले व थोडेसे रक्त आले. तेव्हा त्या अनुशंगाने ते म्हणाले, "मला आता लहानशी जखम झाली ते बरे झाले नाहीतर इथे काम करणाऱ्या एखाद्याला बरीच गंभीर जखम झाली असती".

१९९२ पर्यंत आश्रमाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत सत्संगाची हजेरी ४० पासून ३०० पर्यंत गेली होती. स्थानिक लोकांनी उदारमनाने दान दिले व बांधकामामध्ये आपले कौशल्यही प्रदान केले. हे आश्रम गुरुदेवांच्या उत्तर भारताच्या व विदेशाच्या प्रवासामधील मुकामाची जागा बनले आहे. १९९८ मध्ये इंद्रप्रस्थ मैदानामध्ये झालेल्या गुरुदेवांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमादरम्यान हे आश्रम कार्यकलापांचे केंद्रस्थान बनले होते. १५ जून २००१ रोजी शेजारील हरियाणा राज्यामधील गुडगाव येथील पालम फार्म्स येथे दूसरे क्षेत्रीय आश्रम झाले आहे.





आर के पूरम आश्रम पालम विमानतळ आणि दिल्ली रेल्वे स्थानक या दोहोंपासून एकसारखेच म्हणजे १५ किमी च्या अंतरावर वसले आहे. याच्या या स्थानामुळे सतखोलहून व सतखोलकडे जाणाऱ्या अभ्यासींसाठी हे एक सोयीचे प्रवासी केंद्र बनले आहे.


**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india**
**For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**



© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
"Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.